महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने (महानिर्मिती) भुसावळ औ. वि. केंद्र संच क्र. ६ (१ X ६६० मे. वॅट), या प्रकल्पाचा भांडवली खर्च तसेच अंतिम वीज दर निश्चितीकरणासाठी सादर केलेली याचिका (प्रकरण क्रमांक १९५/२०२५)

१ कार्यकारी सारांश

१.१ याचिकेची पार्श्वभूमी व व्याप्ती

१.१.१.१ महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (यापुढे "महानिर्मिती" किंवा "याचिकाकर्ता" म्हणून संबोधण्यात येईल) ही महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णय क्र. ELA-००३/P.K.८५८८/भाग-२/ऊर्जा-५, दिनांक २४ जानेवारी २००५ अन्वये स्थापन झालेली कंपनी असून, दिनांक ६ जून २००५ पासून कार्यरत आहे. ही कंपनी विद्युत कायदा, २००३ मध्ये नमूद केलेल्या तरतुदींनुसार कार्यरत आहे. दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी महानिर्मितीची एकूण स्थापित क्षमता १३८८०.५५ मेगावॅट असून, ती देशातील सर्वात मोठी राज्य वीज निर्मिती कंपनी आहे.

१.१.१.२ मा. आयोगाने प्रकरण क्र. १५४/२०१८ मधील दिनांक ०१.०८.२०१८ च्या आदेशाद्वारे भुसावळ येथे १X६६० मेगावॅट क्षमतेचा प्रतिस्थापन प्रकल्प उभारण्यास महानिर्मिती ला मान्यता दिली होती. त्यानुसार, याचिकाकर्त्याने महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील पिंप्री-सेकम गाव येथे ११५.९३ हेक्टर क्षेत्रावर १X६६० मेगावॅट क्षमतेचा (संच क्र. ६) सुपर-क्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित भुसावळ कोळसा-आधारित औष्णिक वीज प्रकल्प उभारला आहे. भुसावळ संच क्र. ६ ने दिनांक २२.०२.२०२५ रोजी व्यावसायिक कार्यान्वयन दिनांक (CoD) प्राप्त केला आहे.

१.१.१.३ महानिर्मिती सदर याचिकेद्वारे भुसावळ संच क्र. ६ च्या भांडवली खर्चास मान्यता मिळविण्यासाठी तसेच म.वि.नि.आ.(ब.वा.वी.) विनिमय, २०१९ आणि २०२४ नुसार अनुक्रमे आ.व.२०२४-२५ ते आ.व. २०२९-३० या कालावधीसाठी वार्षिक महसुलाची आवश्यकता (ARR) निश्चित करण्यासाठी आणि आ.व.२०२४-२५ साठी तात्पुरत्या अंतिम समायोजनास (Provisional True Up) मान्यता मिळविण्यासाठी मा. आयोगासमोर ही याचिका दाखल करीत आहे.

१.१.१.४ सदर याचिकेद्वारे महानिर्मिती मा. आयोगाच्या विचारार्थ खालील बाबी सादर करीत आहे:

अ) भुसावळ संच क्र. ६ साठी भांडवली खर्च निश्चित करणे.

ब) म.वि.नि.आ.(ब.वा.वी.) विनिमय, २०१९ नुसार आ.व.२०२४-२५ साठी वीजदर निश्चित करणे.

क) म.वि.नि.आ.(ब.वा.वी.) विनिमय, २०१९ नुसार आ.व.२०२४-२५ साठी तात्पुरते अंतिम समायोजन (Provisional True Up) करणे.

ड) म.वि.नि.आ.(ब.वा.वी.) विनिमय, २०२४ मध्ये नमूद केलेल्या तत्त्वांच्या आधारे पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी आ.व.२०२५-२६ ते आ.व. २०२९-३० या कालावधीचा बहुवर्षीय वीजदर (Multi Year Tariff – MYT) निश्चित करणे.

१.२ भुसावळ संच क्र. ६ साठी भांडवली खर्च

१.२.१.१ मुख्य संयंत्र व उपकरणांचा पुरवठा आणि स्थापना तसेच मुख्य संयंत्राशी संबंधित उर्वरित संयंत्र (BoP) आणि नागरी संरचना कामांसाठीचा करार M/s BHEL यांना देण्यात आला आहे.

१.२.१.२ दरविषयक नियमावलीनुसार, संचाच्या व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकापर्यंत (COD) प्रत्यक्ष झालेला खर्च हा प्रकल्पाच्या भांडवली खर्चाचा आधार असेल, मात्र तो मा. आयोगाच्या विवेकपूर्ण तपासणीच्या (Prudence Check) अधीन राहील. भुसावळ संच क्र. ६ च्या व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकापर्यंतच्या प्रकल्पाच्या भांडवली खर्चाचा एकूण तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे:

तक्ता १ : व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकारोजी भुसावळ संच क्र. ६ चा भांडवली खर्च (रु. कोटी)

भांडवली खर्च	**(रुपये कोटी) २२.०२.२०२५ अखेरीस**
जमीन आणि भू -विकास	३१.७३
बाष्पक, चलित्र, जनित्र (बीटीजी)	३,३२५.६२
कर	-
प्रारंभिक सुटेभाग	९६.११
बांधकाम व कार्यान्वयन पूर्व खर्च	८९.९७
देयक न पाठवलेला अनिश्चित वीज पुरवठा खर्च	२०३.१३
अतिरिक्त कामे	६३.८५
किमतीतील तफावत	५२७.८९
औद्योगिक सामाजिक उत्तरदायित्व	४.५८
वरकड खर्च	३३८.२४
सल्लागार खर्च	९.२३
प्रत्यक्ष खर्च	४,६९०.३५
बांधकामाधीन काळातील व्याज	१,१२२.०३
एकूण भांडवली खर्च	५,८१२.३८

१.३ वित्तपुरवठा योजना

१.३.१.१ भुसावळ संच क्र. ६ चा भांडवली खर्च हा कर्ज आणि समभाग भांडवल (Equity) यांच्या संयोगातून, व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकापर्यंत (CoD) करण्यात आला आहे. महानिर्मिती ने भुसावळ संच क्र. ६ च्या मुख्य संयंत्रासाठी ९.१५% वार्षिक व्याजदराने आणि तीन वर्षांच्या पुनर्निर्धारणासह (reset) रु. ३४३२ कोटींचे दीर्घकालीन कर्ज निश्चित केले आहे. त्यानंतर महानिर्मिती ने अतिरिक्त कर्ज म्हणून रु. १२३२.४६ कोटी तसेच FGD व SCR बसविणे आणि इतर बदलांची कामे यासाठी रु. ५२४ कोटींचे अतिरिक्त कर्ज REC कडून घेतले आहे. भुसावळ संच क्र. ६ च्या व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकावेळी रु. ५८१२.३४ कोटींच्या भांडवलीकृत रकमेसाठी महाराष्ट्र शासनाकडून (GoM) प्राप्त झालेल्या रु. ८५८ कोटींच्या एकूण समभाग भांडवलाचा उपयोग करण्यात आला असून, उर्वरित रक्कम कर्जाद्वारे पुरविण्यात आली आहे.

याशिवाय, महानिर्मिती ने महाराष्ट्र शासनाकडे अतिरिक्त रु. ४१२ कोटींच्या समभाग भांडवलासाठी विनंती केली असून, सदर रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही.

१.३.१.२ वरील प्रकल्प खर्चानुसार, व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकारोजी प्रकल्पासाठी वित्तपुरवठ्याचे साधन खालील तक्त्यात दर्शविण्यात आले आहे:

तक्ता २ : भुसावळ संच क्र. ६ साठी वित्तपुरवठ्याची साधने (रु. कोटी)

तपशील	**मंजूर कर्ज (रुपये कोटी)**	**कार्यान्वयन दिनांकाला उचललेले कर्ज (रुपये कोटी)**	**शेरा**
प्रकल्प खर्च			
कर्ज			
REC			
ऋण १	३,४३२.००	३,४३२.००	मुख्य संयंत्र संबंधित भांडवली खर्चाकरिता
ऋण २	५२४.००	२५२.८०	FGD, SCR व संयंत्रातील इतर फेरबदलांकरिता
ऋण ३	१,२३२.४६	७७५.९६	उर्वरित प्रकल्प गरजांकरिता
एकूण कर्ज	**५,१८८.४६**	**४,४६०.७६**	
भाग भांडवल			
महाराष्ट्र शासन	**८५८.००**	**८५८.००**	
अमुक्त दायित्व	**-**	**४९३.६२**	
एकूण वित्तीय उपलब्धता	**६,०४६.४६**	**५,८१२.३८**	

१.३.१.३ त्यानुसार, व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकारोजी युनिटची एकूण वित्तपुरवठा रचना खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे:

तक्ता ३ : व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकारोजी भुसावळ संच क्र. ६ चे वित्तपुरवठा प्रमाण

तपशील	**रुपये कोटी**	**%**
एकूण भांडवली खर्च (अ)	**५,८१२.३८**	
कर्ज (ब)	४,४६०.७५	८३.८७%
भाग भांडवल (क)	८५८.००	१६.१३%
अमुक्त दायित्व (ड)	४९३.६२	
एकूण वित्तीय उपलब्धता (इ = ब + क + ड)	**५,८१२.३८**	**१००.००%**

१.४ आ.व.२०२४-२५ साठी दर निश्चिती आणि आ.व.२०२४-२५ चे तात्पुरते अंतिम समायोजन

१.४.१.१ स्थिर शुल्काच्या (Fixed Charges) उद्देशाने व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकारोजीचा रु. ५८१२.३८ कोटींचा भांडवली खर्च विचारात घेण्यात आला आहे. स्थिर शुल्काशी संबंधित घटक म.वि.नि.आ.(ब.वा.वी.) विनिमय, २०१९ मधील संबंधित तरतुदींनुसार खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत:

अ) भांडवली खर्च व अतिरिक्त भांडवलीकरण:

व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकारोजीचा भांडवली खर्च रु. ५८१२.३८ कोटी विचारात घेण्यात आला आहे. व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकानंतर रु. २३.६८ कोटींचे अतिरिक्त भांडवलीकरण विचारात घेण्यात आले असून, त्यानुसार आ.व.२०२४-२५ मध्ये एकूण रु. ५८३६.०७ कोटींचे भांडवलीकरण विचारात घेण्यात आले आहे.

ब) संचालन व सुव्यवस्थापन खर्च:

म.वि.नि.आ.(ब.वा.वी.) विनिमय, २०१९ मधील विनिमय ४७.२ नुसार मानकीय सं. व सु. खर्चाची गणना करण्यात आली असून, व्यावसायिक कार्यान्वयन दिनांक २२.०२.२०२५ असल्याने ३८ दिवसांसाठी तो प्रमाणानुसार (prorated) विचारात घेण्यात आला आहे. प्रत्यक्ष सं. व सु. खर्च प्रत्यक्ष खर्चाच्या तपशीलानुसार मागणी करण्यात आला आहे. वेतन पुनर्निर्धारणाचा (Pay Revision) परिणाम, प्रकरण क्र. १८७/२०२४ मधील बहुवर्षीय वीजदर याचिकेत महानिर्मितीपातळीवर अंदाजित केलेल्या परिणामाच्या आधारे वीजकेंद्राच्या क्षमतेनुसार निश्चित करण्यात आला आहे. वेतन सुधारणेचा (Wage Revision) परिणाम वगळण्यात आला असून म.वि.नि.आ.(ब.वा.वी.) विनिमय, २०१९ मधील विनिमय ४७.१ (इ) नुसार अंतिम समयोजनाच्या वेळी त्याची मागणी करण्यात येईल. पर्यावरणीय मंजुरीमध्ये (EC) अनिवार्य केलेला औद्योगिक सामाजिक बांधिलकी (CSR) खर्च संबंधित वर्षाच्या अंतिम समयोजनाच्या वेळी मागणी करण्यात येईल.

क) घसारा (Depreciation):

विनिमय २८ नुसार, व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकानंतरच्या 38 दिवसांच्या कालावधीसाठी सुरुवातीच्या एकूण स्थिर मालमत्तेवर सरळरेषीय पद्धतीने (Straight-Line Method) घसाऱ्याची गणना करण्यात आली आहे.

ड) कर्जावरील व्याज (Interest on Loan):

प्रमाणित सरासरी कर्ज आणि भारित सरासरी व्याजदराच्या आधारे प्रमाणित कर्जावरील व्याजाची गणना करण्यात आली आहे. वित्तीय शुल्काची मागणी अंतिम समयोजनाच्या वेळी करण्यात येईल.

इ) खेळत्या भांडवलावरील व्याज (IoWC):

विनिमय ३२.१ नुसार प्रमाणित घटकांचा विचार करून आणि १०.५% खेळत्या भांडवलावरील व्याज दर लागू करून गणना करण्यात आली आहे. हा दर SBI MCLR + 150 बेसिस पॉइंट्स इतका आहे.

फ) समभाग भांडवलावरील परतावा (Return on Equity):

आ.व.२०२४-२५ साठी समभाग भांडवलावरील परतावा १४.५०% (मूलभूत दर १४% + Ramp Rate शी संबंधित अतिरिक्त स.भा.प. ०.५%) इतका विचारात घेण्यात आला आहे. रु. ८६२.७४ कोटींच्या समभाग भांडवलावर ३८ दिवसांच्या कालावधीसाठी प्रमाणानुसार भांडवलावरील परताव्याची गणना करण्यात आली आहे. विनिमय २९.६ नुसार MTBF शी संबंधित भांडवलावरील परताव्याची अतिरिक्त मागणी अंतिम समयोजनाच्या वेळी करण्यात येईल.

ग) आयकर (Income Tax):

मागील वर्षांत कोणताही आयकर भरलेला नसल्यामुळे आ.व.२०२४-२५ साठी कोणताही आयकर प्रस्तावित केलेला नाही.

ह) बिगर-दर उत्पन्न (Non-Tariff Income – NTI):

अंदाजित आधारावर रु. ०.१० कोटींचे NTI विचारात घेण्यात आले आहे. आ.व.२०२४-२५ च्या अंतिम समयोजनामध्ये प्रत्यक्ष NTI सादर करून विचारात घेतले जाईल.

१.४.१.२ वार्षिक स्थिर खर्च (AFC):

वरील घटकांच्या आधारे आ.व.२०२४-२५ मधील ३८ दिवसांच्या कार्यान्वित कालावधीसाठी भुसावळ संच क्र. ६ चा वार्षिक स्थिर खर्च मागणी निश्चित करून मंजुरीसाठी खालीलप्रमाणे सादर करण्यात आला आहे:

तक्ता ४ : आ.व.२०२४-२५ साठी भुसावळ संच क्र. ६ चा वार्षिक स्थिर खर्च मागणी (रु. कोटी)

तपशील	एकक	प्र. क्र. २३६ / २०२३ मधील आदेशानुसार मंजूर केलेला तात्पुरता आकार	मानकानुसार मान्य करण्यायोग्य आकार
संचलन व सुव्यवस्था खर्च	रु. कोटी	१८.७४	१२.७३
पाण्याचा खर्च	रु. कोटी		०.३९
अतिरिक्त संचलन व सुव्यवस्था खर्च (ECS)	रु. कोटी	-	-
घसारा	रु. कोटी	४३.१७	३१.३६
दीर्घ मुदत कर्जावरील व्याज	रु. कोटी	५९.८७	४७.९९
दीर्घ मुदत कर्जावरील व्याज (मुख्य कार्यालय मालमत्ता निगडीत)	रु. कोटी	-	-
खेळत्या भांडवलावरील व्याज	रु. कोटी	१०.८३	१२.७५
खेळत्या भांडवलावरील व्याज (ECS)	रु. कोटी	-	-
आय कर	रु. कोटी	-	-
भांडवला वरील परतावा	रु. कोटी	२४३.७	१३.०२
इतर खर्च	रु. कोटी	-	२.६८
वजा : वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न	रु. कोटी	-	०.१
एकूण वार्षिक स्थिर आकार	**रु. कोटी**	**३७६.३१**	**१२०.८४**

१.४.२ ऊर्जा शुल्क

१.४.२.१ आ.व.२०२४-२५ साठी दर निश्चित करण्याच्या उद्देशाने महानिर्मिती ने म.वि.नि.आ.(ब.वा.वी.) विनियम, २०१९ नुसार ऊर्जा शुल्काची गणना केली आहे. इंधनाचे एकूण उष्मा मूल्य हे GCV-As Billed ला आधार मानून मानकीय पद्धतीने निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार, प्रत्यक्ष निर्मितीशी संबंधित प्रत्यक्ष इंधन खर्च दर्शविताना, याचिकाकर्त्याने प्रमाणित चौकटीअंतर्गत अनुमत होणाऱ्या ऊर्जा शुल्काची पुनर्गणनासुद्धा करून दाखवली आहे.

तक्ता ५ : आ.व.२०२४-२५ साठी भुसावळ संच क्र. ६ चा इंधन खर्च (रु. कोटी)

तपशील	**एकक**	**मानकानुसार मान्य करण्यायोग्य आकार**	**प्रत्यक्ष खर्च**
कोळशावरील खर्च	रु. कोटी	९९.२४	१२०.२७
इंधन तेलावरील खर्च	रु. कोटी	०.९१	५.९२
एकूण इंधन खर्च	**रु. कोटी**	**१००.१५**	**१२६.१९**

१.४.३ आ.व.२०२४-२५ चे तात्पुरते अंतिम समायोजन

१.४.३.१ आ.व.२०२४-२५ मधील प्रत्यक्ष आणि प्रमाणित वार्षिक महसुलाची आवश्यकता (ARR) विचारात घेऊन तसेच आ.व.२०२४-२५ मध्ये प्राप्त झालेल्या प्रत्यक्ष महसुलाचा विचार करून, आ.व.२०२४-२५ साठी खालीलप्रमाणे तात्पुरते अंतिम समायोजन सादर करण्यात आले आहे:

तक्ता ६ : आ.व.२०२४-२५ चे तात्पुरते अंतिम समायोजन (रु. कोटी)

तपशील	**तात्पुरते समायोजन (मानकानुसार)**	**प्रत्यक्ष खर्च**
भांडवला वरील परतावा	१३.०२	१३.०२
दीर्घ मुदत कर्जावरील व्याज	४७.९९	४७.९९
घसारा	३१.३६	३१.३६
संचलन व सुव्यवस्था खर्च	११.८७	९.२३
कर्मचारी पगारवादीचा बोजा	०.८७	०.८७
श्रमिक वेतन दरातील वाढीचा बोजा		
पाण्याचा खर्च	०.३९	०.३९
इतर खर्च	२.६८	२.६८
खेळत्या भांडवलावरील व्याज	१२.७५	१२.७५
वजा : वीज दरा व्यतिरिक्त उत्पन्न	०.१	०.१
एकूण वार्षिक स्थिर आकार (अ)	**१२०.८४**	**११८.२१**
इंधन खर्च (ब)	१००.१५	१२६.१९
एकूण महसुलाची आवश्यकता (क=अ+ब)	**२२०.९९**	**२४४.४**
वीज विक्रीतून प्राप्त उत्पन्न (ड)	**१५८.२३**	**१५८.२३**
महसुलातील तफावत (वध /घट)इ=क-ड	**६२.७७**	**६२.७७**

१.५ पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी (आ.व.२०२५-२६ ते आ.व. २०२९-३०) बहुवर्षीय वीजदर नियंत्रण

१.५.१ इंधन वापर योजना

१.५.१.१ ५ व्या बहुवर्षीय वीजदर नियंत्रण कालावधीसाठी (आ.व.२०२५-२६ ते आ.व. २०२९-३०) भुसावळ संच क्र. ६ साठी विश्वसनीय इंधन पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी तसेच मानकीय उपलब्धता आणि संयंत्र भारांक लक्ष ८५% साध्य करण्याच्या उद्देशाने याचिकाकर्त्याने प्रस्तावित कोळसा खरेदी/पुरवठा योजना सादर केली आहे.

१.५.१.२ कोळशाची आवश्यकता:

२१३९ kCal/kWh इतका एकूण उष्मांक दर मानक (Normative SHR) आणि सुमारे ३४०० kCal/kg इतका 'As Received' GCV विचारात घेऊन भुसावळ संच क्र. ६ साठी कोळशाची आवश्यकता अंदाजे ३.१९ द.ल.मे.ट. प्रति वर्ष इतकी निश्चित करण्यात आली आहे.

अ) देशांतर्गत कोळसा जोडणी (Domestic Linkage):

याचिकाकर्त्याने WCL सोबत २.८६३ द.ल.मे.ट. कोळशासाठी सामंजस्य करार (MoU) केला आहे आणि व्यावसायिक कार्यान्वयन दिनांकानंतर (CoD) त्याचा पुरवठा सुरू झाला आहे. यामध्ये:

i. कोलार पिंपरी खाणीमधून ०.८५ द.ल.मे.ट.,

ii. इतर खाण-विशिष्ट स्तोत्र मधून १.१४६ द.ल.मे.ट.,

iii. वाघोडा खाणीमधून ०.८६७ द.ल.मे.ट. (आ.व.२०२७-२८ पासून अपेक्षित).

ब) लोहमार्ग-समुद्रमार्ग-लोहमार्ग (RSR) वाहतूक:

ऊर्जा मंत्रालय (MoP) आणि कोळसा मंत्रालय (MoC) यांच्या निर्देशांनुसार, महानिर्मिती ने MCL (ओडिशा) येथून पारादीप ते महाराष्ट्रात धरमतर बंदरापर्यंत समुद्र मार्गे व उर्वरित लोहमार्ग पद्धतीने (RSR) कोळसा वाहतूक सुरू केली आहे. या उपक्रमामुळे:

i. सातत्यपूर्ण कोळशाची गुणवत्ता (G-१२ दर्जा) सुनिश्चित झाली आहे,

ii. उच्च संयंत्र भारघटक लक्षांक (PLF), सहाय्यकारी वीजेचा आणि दुय्यम इंधन तेलाचा कमी वापर यामुळे कार्यक्षमतेत सुधारणा झाली आहे,

iii. Sub-Group (Gencos) च्या निर्देशानुसार RSR वाहतुकीसाठी दररोज 1.5 रेक्सचे नियोजन करून रसद नियोजन अधिक सक्षम झाले आहे.

बहुवर्षीय वीजदर अंदाजासाठी MCL कडून RSR मार्गाने ०.५० द.ल.मे.ट. कोळसा विचारात घेण्यात आला असून त्याचा एकूण उष्मा मूल्य ३५०८ kCal/kg आहे.

क) आयातीत कोळसा:

ऊर्जा मंत्रालय (MoP) च्या दिनांक २७.०६.२०२४ च्या सल्ल्यानुसार, महानिर्मिती ने संपूर्ण महानिर्मिती साठी १५.१०.२०२४ पर्यंत ४% आयातीत कोळशाचे मिश्रण केले होते. त्यानंतर कोणतेही पुढील निर्देश उपलब्ध नसल्यामुळे

भुसावळ संच क्र. ६ च्या बहुवर्षीय वीजदर नियंत्रण कालावधीच्या इंधन वापर योजनेत आयातीत कोळशाचा विचार केलेला नाही.

ड) आ.व.२०२५-२६ ते आ.व. २०२९-३० मधील कोळशाचे मिश्रण:

सदर याचिका दाखल करताना आ.व.२०२५-२६ हा कालावधी आधीच संपलेला असल्याने, आ.व.२०२५-२६ साठी प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या कोळशाच्या आधारे कोळशाचे मिश्रण विचारात घेण्यात आले आहे. आ.व.२०२६-२७ ते आ.व.२०२९-३० साठी प्रस्तावित कोळशाचे मिश्रण देशांतर्गत कोळसा जोडणी (Coal linkage) द्वारे मिळणारा कोळसा आणि MCL कडून RSR मार्गाने मिळणारा कोळसा यांचा समावेश असलेले आहे. त्याचा तपशील याचिकेसोबत सादर केलेल्या इंधन वापर योजनेत देण्यात आला आहे.

तक्ता ७: आ.व.२०२५-२६ ते आ.व. २०२९-३० साठी भुसावळ संच क्र. ६ साठी विचारात घेतलेला कोळशाचा एकूण उष्मा मूल्य (GCV) व किंमत

कोळशाचा स्त्रोत	आ व २०२५-२६ साठी प्रत्यक्ष			नियंत्रण कालावधीतील उर्वरित वर्ष					
	विशिष्ट उष्मांक	एकूण खरेदी मात्रा (द. ल. मे. टन)	एकूण खरेदी दर (रु. / मे. टन)	विशिष्ट उष्मांक	एकूण खरेदी मात्रा (द. ल. मे. टन)	आ व २६-२७	आ व २७-२८	आ व- २८-२९	आ व २९-३०
एकूण देशी कोळसा	३२०२	२.९६	४५२७	३२०४	३.३६	४६३७		४९२०	५०६७
एकूण देशी कोळसा (वहन घट विचारात घेऊन)						४६७५	४८१५	४९५९	५१०८
आयात कोळसा	४६८२	०.१२	११,२१४						
एकूण | सरासरी	३२६०	३.०८	४७९२		३.३६	४६७५	४८१५	४९५९	५१०८
अधिक अंतर्गत कोळसा हाताळणी खर्च #			३४.८०			३५.८५	३६.९२	३८.०३	३९.१७
एकूण खरेदी दर			४८२७			४७१०	४८५२	४९९७	५१४७

१.५.१.३ कोळसा आणि दुय्यम तेलाच्या किमतींमध्ये प्रति वर्ष ३% वाढ गृहीत धरून, बहुवर्षीय वीजदर नियंत्रण कालावधी आ.व.२०२५-२६ ते आ.व. २०२९-३० साठी कोळसा आणि दुय्यम तेलाच्या किमती विचारात घेण्यात आल्या आहेत.

१.५.२ उत्सर्जन नियंत्रण प्रणाली (FGD आणि SCR प्रणाली) व त्यासंबंधित खर्च

१.५.२.१ MoEF&CC च्या दिनांक ७ डिसेंबर २०१५ च्या अधिसूचनेनुसार आणि त्यानंतरच्या सुधारणांनुसार, कोळशावर आधारित औष्णिक वीज प्रकल्पांना प्रकल्पाची क्षमता आणि कार्यान्वयन वर्षानुसार SOx, NOx आणि Particulate Matter यांच्या उत्सर्जनासंबंधी सुधारित पर्यावरणीय निकषांचे पालन करणे आवश्यक आहे.

१.५.२.२ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (MPCB) भुसावळ संच क्र. ६ ला सशर्त पर्यावरणीय मंजुरी (Environmental Clearance) दिली असून, MoEF&CC च्या दिनांक ५ सप्टेंबर २०२२ च्या अधिसूचनेत नमूद केलेल्या कालमर्यादेत उत्सर्जन मानकांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी Flue Gas Desulphurisation (FGD) प्रणाली बसविण्याचे निर्देश दिले आहेत.

१.५.२.३ नियामक आवश्यकतांनुसार FGD आणि Selective Catalytic Reduction (SCR) प्रणाली आ.व.२०२६-२७ मध्ये कार्यान्वित करण्याचे नियोजन करण्यात आले होते.

१.५.२.४ दिनांक ११.०७.२०२५ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या Environment (Protection) Fourth Amendment Rules, 2025 नुसार भुसावळ संच क्र. ६ हे प्रवर्ग क मध्ये येते. पुढे, प्रवर्ग क मधील सर्व औष्णिक वीज प्रकल्पांसाठी Sulphur Dioxide उत्सर्जन मानके लागू होणार नाहीत, परंतु दिनांक ३० ऑगस्ट १९९० च्या अधिसूचना क्र. GSR 742 (E) नुसार निर्धारित Stack Height निकषांचे पालन करणे आवश्यक आहे. विद्यमान प्रवर्ग क औष्णिक वीज प्रकल्पांकडून Stack Height निकषांचे पालन सुनिश्चित करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२९ आहे.

वरील सुधारणेनुसार, निर्धारित निकषांचे पालन होत असेपर्यंत भुसावळ संच क्र. ६ साठी FGD चालविणे अनिवार्य नाही. त्यानंतर CEA ने विविध वीज निर्मिती कंपन्यांसोबत प्रवर्ग क अंतर्गत येणाऱ्या वीज केंद्रांमध्ये FGD स्थापनेच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली. सदर बैठकीच्या दिनांक २५.०७.२०२५ च्या कार्यवृत्तानुसार (MoM), महानिर्मिती ने आपल्या लाभार्थी वितरण कंपनीशी संपर्क साधून खालील पर्यायांपैकी एक निवडण्याची विनंती केली आहे:

- FGD चे पूर्ण कार्यान्वयन व संचालन करून भांडवली खर्च तसेच सं. व सु. खर्च करणे; किंवा
- FGD चे कार्यान्वयन थांबवून आजपर्यंत झालेला केवळ भांडवली खर्चाचे वहन करणे.

FGD चालविल्यामुळे वीजदरावर होणारा लक्षणीय परिणाम लक्षात घेता, महानिर्मिती सध्या FGD चे कार्यान्वयन थांबविण्याबाबत आणि आजपर्यंत झालेला भांडवली खर्च विचारात घेण्याबाबत लाभार्थीचा सकारात्मक प्रतिसाद अपेक्षित करीत आहे. त्यानुसार, दर निश्चितीच्या उद्देशाने महानिर्मिती ने आजपर्यंत FGD साठी झालेल्या केवळ भांडवली खर्चाचा परिणाम विचारात घेतला आहे.

१.५.२.५ महानिर्मिती ने FGD पुरवठादाराशी देखील चर्चा करून भुसावळ संच क्र. ६ येथे सध्या बसविण्यात आलेल्या FGD उपकरणांचा महानिर्मिती च्या इतर वीज केंद्रांमध्ये किंवा FGD पुरवठादारास योग्य वाटणाऱ्या इतर कोणत्याही उपयोगासाठी पर्यायी वापर करता येण्याची शक्यता तपासण्यास सांगितले आहे. बसविण्यात आलेल्या FGD उपकरणांपैकी कोणत्याही उपकरणाचा अशा प्रकारे पर्यायी वापर केल्यास भुसावळ संच क्र. ६ च्या मालमत्तेच्या मूल्यामध्ये घट होईल आणि परिणामी महानिर्मिती कडून मागणी करण्यात येणाऱ्या स्थिर खर्चामध्ये त्यानुसार घट होईल.

त्यामुळे, पुढील टप्प्यावर भांडवली खर्चाच्या स्थितीत कोणताही बदल झाल्यास, महानिर्मिती संबंधित कालावधीच्या अंतिम समायोजन प्रक्रियेदरम्यान फरकाचा तपशील सादर करेल आणि लाभार्थी महावितरण मार्फत अंतिम वीज ग्राहकाला त्याचा लाभ देईल.

१.५.२.६ SCR प्रणालीबाबत, कोणतेही स्वतंत्र मार्गदर्शक निर्देश उपलब्ध नसल्यामुळे महानिर्मिती ने सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंत SCR प्रणालीचे पूर्ण कार्यान्वयन आणि त्यानंतर नियमित संचालन गृहीत धरले आहे. तथापि, महानिर्मिती चिमणीवाटे उत्सर्जनाशी संबंधित घटकांचे बारकाईने निरीक्षण करून आणि प्रणालीचा विवेकपूर्ण वापर करून MoEFCC व MPCB च्या उत्सर्जन निकषांचे पालन करण्यासाठी या सुविधेचे इष्टतम संचालन करेल, ज्यामुळे अभिक्रियक (Reagent) खर्चाचा अनावश्यक भार टाळता येईल.

१.५.३ MYT नियंत्रण कालावधीसाठी कार्यप्रदर्शन व प्रमाणित निकष

१.५.३.१ मविनिआ. बहुवार्षिक वीजदर विनियम, २०२४ नुसार , 5व्या MYT नियंत्रण कालावधीसाठी भुसावळ संच-६ साठी खालील प्रमुख कार्यप्रदर्शन निकष विचारात घेण्यात आले आहेत:

अ) उपलब्धता व सयंत्र भार घटक लक्ष्यांक**:**
इंधन वापर योजनेच्या आधारे लक्ष्यित उपलब्धता आणि PLF दोन्ही ८५% विचारात घेण्यात आले आहेत.

आ) केंद्रातील एकूण उष्मांक भारांक (कि.कॅ/ युनिट) (GSHR):
म. वी. नि. आ. च्या प्रचलित विनियमनानुसार समकक्ष क्षमतेच्या वीज संचांसाठी प्रमाणित GSHR २२३० कि. कॅ / युनिट असला तरी, बहुवार्षिकवीजदर आदेश (१८७/२०२४) मध्ये Design उष्मांक दराप्रमाणे मंजूर केलेल्या उष्मांक दराच्या आधारे , याचिकाकर्त्याने त्यापेक्षा कमी २१३९.०५ कि.कॅ/ युनिट) इतका GSHR विचारात घेतला आहे. प्रत्यक्ष कार्यप्रदर्शन चाचणीच्या (PG test) आधारे GSHR मध्ये सद्य किंवा पुढील MYT कालावधीत सुधारणा करण्याची विनंती याचिकाकर्त्याने केली आहे.

इ) साहाय्यकारी ऊर्जा वापर (%) Auxiliary Energy Consumption (AEC):

SCR प्रणाली कार्यान्वित होईपर्यंत ५.७५% आणि SCR प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर ५.९५% AEC विचारात घेण्यात आले आहे, जे मविनिआ. बहुवार्षिकवीजदरविनियम, २०२४ मधील विनियम ४७.१३ आणि ४७.१८ नुसार आहे. तथापि, SCR कार्यान्वित होण्याची शक्यता असलेल्या आ. व. २०२६-२७ साठी अतिरिक्त AEC च्या निम्म्या म्हणजे ०.१०% अतिरिक्त AEC चा विचार करण्यात आला आहे. त्यामुळे आ. व. २०२६-२७ साठी एकूण AEC ५.८५% विचारात घेण्यात आले आहे.

ई) दुय्यम इंधन-तेल वापर (मि.ली. / युनिट) (SFOC):

मविनिआ. बहुवार्षिक वीजदर विनियम, २०२४ मधील विनियम ४७.११ नुसार SFOC ०.५० मि.ली. / युनिट विचारात घेण्यात आले आहे.

ए) कोळसा वाहतूक हानी (%):

भुसावळ संच-६ हे खाणीजवळ नसलेले विजकेन्द्र असल्यामुळे म.वि.नि.आ. बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०२४ मधील विनियम ४७.२० नुसार ०.८० % प्रमाणित कोळसा वाहतूक हानी (%) विचारात घेण्यात आला आहे.

१.५.४ ५व्या MYT नियंत्रण कालावधीसाठी ऊर्जा शुल्क - आ. व. २०२५-२६ ते आ. व. २०२९-३०

१.५.४.१ आ. व. २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीसाठी दर निश्चित करण्याच्या उद्देशाने महानिर्मिती ने म.वि.नि.आ. बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०२४ नुसार ऊर्जा शुल्काची गणना केली आहे. कोळसा आणि दुय्यम इंधन-तेल वापर Secondary Oil चा एकूण उष्मांक दर आणि मूल्य याचिकेसोबत सादर केलेल्या इंधन वापर योजने Fuel Utilisation Plan नुसार विचारात घेण्यात आली आहे.

१.५.५ ५ व्या MYT नियंत्रण कालावधीसाठी स्थिर शुल्क - आ. व. २०२५-२६ ते आ. व. २०२९-३०

१.५.५.१ स्थिर शुल्काच्या गणनेसाठी व्यावसायिक कार्यान्वयन दिनांक (COD) रोजीचा भांडवली खर्च तसेच निर्दिष्टीत प्रकल्प पूर्णत्व दिनांकापर्यंत (Cut off date) प्रकल्प योजनेनुसार आणि निर्दिष्टीत प्रकल्प पूर्णत्व

दिनांकानंतरच्या ५ व्या बहु-वर्षीय वीजदर नियंत्रण कालावधीमधील उर्वरित काळासाठी संचलन व सुव्यवस्था गरजांनुसार असे आ. व. २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीत एकूण प्रस्तावित अतिरिक्त भांडवलीकरण विचारात घेण्यात आले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

तक्ता ८ : ५ व्या MYT नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित अतिरिक्त भांडवलीकरण

तपशील	२२-०२-२०२५ ते ३१.०३.२०२५	आर्थिक वर्ष २०२५-२६	आर्थिक वर्ष २०२६-२७	आर्थिक वर्ष २०२७-२८	आर्थिक वर्ष २०२८-२९	आर्थिक वर्ष २०२९-३०
निर्दिष्ट दिनांकापर्यंत अतिरिक्त भांडवलीकरण	२३.६८	२३८.०२	७३१.१७	१३७.०१		
निर्दिष्ट दिनांकानंतरचे अतिरिक्त भांडवलीकरण					१८.७५	२५.००
एकूण अतिरिक्त भांडवलीकरण	**२३.६८**	**२३८.०२**	**७३१.१७**	**१३७.०१**	**१८.७५**	**२५.००**

१.५.५.२ म.वि.नि.आ. बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०२४ मधील संबंधित तरतुदींनुसार स्थिर शुल्काशी संबंधित घटक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत:

ऐ) भांडवली खर्च व अतिरिक्त भांडवलीकरण:

व्यावसायिक कार्यान्वयन दिनांक (COD) रोजीचा रु. ५८१२.३८ कोटींचा भांडवली खर्च आणि वरीलप्रमाणे अतिरिक्त भांडवलीकरण ५ व्या बहु-वर्षीय वीजदर नियंत्रण कालावधीतील स्थिर शुल्काच्या अंदाजासाठी विचारात घेण्यात आले आहे.

ओ) संचालन व देखभाल खर्च (O & M expenses):

म.वि.नि.आ. बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०२४ मधील विनियम ४८.२ नुसार प्रमाणित संचालन व देखभाल (O & M) खर्चाची गणना करण्यात आली आहे. कर्मचारी वेतन पुनर्निर्धारणाचा परिणाम बहु-वर्षीय वीजदर याचिकेत महानिर्मिती पातळीवर अंदाजित केलेल्या परिणामाच्या आधारे क्षमतेनुसार निश्चित करण्यात आला आहे. श्रमिक वेतनदर सुधारणेचा परिणाम वगळण्यात आला असून, संबंधित वर्षाच्या अंतिम समायोजनाच्या वेळी त्याची मागणी करण्यात येईल. पर्यावरणीय मंजुरीनुसार अनिवार्य असलेला औद्योगिक सामाजिक बांधिलकी (CSR) खर्च संबंधित वर्षाच्या अंतिम समायोजन वेळी मागणी करण्यात येईल.

औ) घसारा:

संबंधित वर्षाच्या सुरुवातीच्या एकूण स्थिर मालमत्ते (GFA) वर सरळरेषीय पद्धतीने घसाऱ्याची गणना करण्यात आली आहे.

अं) दीर्घकालीन कर्जावरील व्याज:

प्रमाणित सरासरी कर्ज आणि भारित सरासरी व्याजदराच्या आधारे प्रमाणित कर्जावरील व्याज विचारात घेण्यात आले आहे. वित्तीय शुल्काची मागणी अंतिम समायोजनाच्या वेळी करण्यात येईल.

अः) खेळत्या भांडवलावरील व्याज (IoWC):

विनियम ३२.१ नुसार प्रमाणित घटकांचा विचार करून आणि १०.५% IoWC दर लागू करून गणना करण्यात आली आहे. हा दर SBI MCLR + १५० बेसिस पॉइंट्स इतका आहे.

क) समभाग भांडवलावरील परतावा (ROE):

म.वि.नि.आ. बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०२४ मधील विनियम २९.२ नुसार भुसावळ संच-६ साठी ROE १५.५०% इतका विचारात घेण्यात आला आहे.

ख) आयकर:

मागील वर्षांत कोणताही आयकर भरलेला नसल्यामुळे कोणताही आयकर प्रस्तावित केलेला नाही.

ग) वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न (NTI):

म.वि.नि.आ. बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०२४ मधील विनियम ४६.२ नुसार NTI अंतर्गत नमूद केलेल्या उत्पन्नाच्या आधारे NTI चा अंदाज करण्यात आला आहे.

१.५.६ ५ व्या बहु-वर्षीय वीजदर नियंत्रण कालावधीसाठी वार्षिक स्थिर खर्च व ऊर्जा शुल्क

१.५.६.१ भांडवलीकरण आणि म.वि.नि.आ. बहु-वर्षीय वीजदर विनियम, २०२४ मधील संबंधित तरतुदींच्या आधारे आ. व. २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीसाठी भुसावळ संच-६ चे वार्षिक स्थिर खर्च आणि ऊर्जा शुल्क खालीलप्रमाणे अंदाजित करण्यात आले आहे:

तक्ता ९ : आ. व. २०२५-२६ ते २०२९-३० साठी भुसावळ संच-६ चा एकूण महसुलाची आवश्यकता (ARR)आणि स्थिर खर्च (AFC) (रु. कोटी)

तपशील	आर्थिक वर्ष २०२५-२६		आर्थिक वर्ष २०२६-	आर्थिक वर्ष २०२७-	आर्थिक वर्ष २०२८-	आर्थिक वर्ष २०२९-
	मानकीत	प्रत्यक्ष				
सं. व दे. खर्च	१६८.४८	१६८.४८	१७५.७९	१८३.४४	१९१.३८	१९९.६६
अतिरिक्त सं. व दे. खर्च (ECS)	-	-	०.४८	१.००	१.०५	१.०९
पाणी खर्च	४५.५१	४५.५१	५०.०६	६३.३	१३७.४४	२२८.२२
घसारा	३०६.२९	३०६.२९	३२६.७४	३४५.०५	३४८.३४	३४८.२१
दीर्घकालीन कर्जावरील व्याज	४५५.३६	४५५.३६	४६१.६४	४६२.२८	४३५.५१	४०४.९४
खेळत्या भांडवलावरील व्याज	६१.८७	६५.५३	६८.४७	७१.३९	७३.९३	७६.४५
खेळत्या भांडवलावरील व्याज - ECS	-	-	०.०५	०.०६	०.०६	०.०६
इतर खर्च	३९.६९	३९.६९	४३.६६	४८.०३	५२.८३	५८.११
ग्रिडचे लवचिक कामकाज - प्रशिक्षण	०.०६	०.०६	०.२८	०.२८	०.२८	०.२२
राख वाहतूक खर्च	-	-	-	-	-	-
भागभांडवला वरील परतावा	१३७.४१	१३७.४१	१५२.४४	१६५.८९	१६८.२८	१६८.८९
वजा - वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न	१.०६	१.०६	१.११	१.१७	१.२३	१.२९
एकूण वार्षिक स्थिर आकार	१,२१३.६०	१,२१७.२६	१,२७८.४९	१,३३९.५६	१,४०७.८५	१,४८४.५८
इंधन खर्च	१,३९८.९६	१,५३५.१४	१,५९९.२०	१,६५१.६८	१,६९६.५९	१,७४७.४८
इंधन खर्च -ECS	-	-	०.०२	०.०३	०.०३	०.०३
एकूण वार्षिक महसुली गरज	२,६१२.५६	२,७५२.४०	२,८७७.७०	२,९९१.२७	३,१०४.४७	३,२३२.१०

टीप: आ. व. २०२५-२६ साठी वरील तक्त्यातील प्रमाणित स्तंभांत कार्यान्वयनाचे निकषांनुसार मानकीय इंधन खर्चाची गणना करण्यात आली असून, त्याचा IoWC वरील परिणाम देखील विचारात घेण्यात आला आहे.

$ लेखापरीक्षित खात्यांनुसार प्रत्यक्ष O&M खर्च या टप्प्यावर उपलब्ध नसल्यामुळे, तो प्रमाणित खर्चानुसार विचारात घेण्यात आला आहे.

तक्ता १० : आ. व. २०२५-२६ ते २०२९-३० साठी भुसावळ संच-६ चा दर (रु. कोटी)

तपशील	मापक	सूत्र	आर्थिक वर्ष २०२५-२६		आ.व २६-२७	आ. व. २७-२८	आ. व. २८-२९	आ.व. २९-३०
			मानकीत	प्रत्यक्ष				
एकूण वार्षिक स्थिर आकार	रुपये (कोटी)	a	**१,२१३.६०**	**१,२१७.२६**	**१,२७८.४९**	**१,३३९.५६**	**१,४०७.८५**	**१,४८४.५८**
मानक ऊर्जा शुल्क दर (रु./kWh) निश्चित करण्याची कार्यपद्धती								
एकूण मानक निव्वळ वीज निर्मिती (ECS वगळता)	(द.ल.यु)	b	३,९०७.७९	३,८५३.९७	४,६३१.७८	४,६४४.४७	४,६३१.७८	४,६३१.७८
एकूण मानक निव्वळ वीज निर्मिती (ECS सह)	(द.ल.यु)	c	३,९०७.७९	३,८५३.९७	४,६२६.८७	४,६३४.६२	४,६२१.९६	४,६२१.९६
एकूण इंधन खर्च (Reagent Cost वगळून).	रुपये (कोटी)	d	१,३९८.९६	१,५३५.१४	१,५९९.२०	१,६५१.६८	१,६९६.५९	१,७४७.४८
Reagent cost	रुपये (कोटी)	e	-	-	०.०२	०.०३	०.०३	०.०३
एकूण इंधन खर्च (Reagent Cost सह).	**रुपये (कोटी)**	**f=d+e**	**१,३९८.९६**	**१,५३५.१४**	**१.५९९.२१**	**१,६५१.७२**	**१,६९६.६२**	**१,७४७.५२**
ऊर्जा शुल्क दर (Reagent Cost वगळून).	**रु./युनिट**	**g=d/b*10**	**३.५८**	**३.९८**	**३.४५३**	**३.५६**	**३.६६**	**३.७७**
ऊर्जा शुल्क दर (Reagent Cost सह).	**रु./युनिट**	**h=f/c*10**	**३.५८**	**३.९८**	**३.४५३**	**३.५६**	**३.६७**	**३.७८**
SCR च्या Reagent Cost चा परिणाम	**रु./युनिट**	**i=g-f**	**-**	**-**	**०.००४**	**०.००८**	**०.००८**	**०.००८**

१.५.६.२ दराची सविस्तर गणना, वरीलप्रमाणे संक्षेपित केलेल्या स्वरूपात, या याचिकेसोबत परिशिष्ट-१ (Annexure-1) म्हणून जोडलेल्या निर्धारित वीजदर आराखडयामध्ये सादर करण्यात आलेली आहे.

१.६ प्रार्थना

१.६.१.१ माननीय आयोगाला सविनय विनंती आहे की,:

१. सदर याचिका दाखल करून स्वीकारण्यात यावी;

२. मा. आयोगास आवश्यक वाटेल अशी अतिरिक्त माहिती सादर करण्यास याचिकाकर्त्यास परवानगी देण्यात यावी;

३. सदर याचिकेची तातडीने सुनावणी घेण्यात यावी;

४. कोविड-१९ मुळे झालेल्या १३ महिन्यांच्या विलंबाचा Force Majeure म्हणून विचार करून, एकूण ५५ महिन्यांचा बांधकाम कालावधी मंजूर करण्यात यावा आणि त्यानुसार बांधकामाधीन काळातील व्याज (IDC) हे भांडवली खर्चाचा भाग म्हणून मान्य करण्यात यावे;

५. ५५ महिन्यांचा बांधकाम कालावधी विचारात घेऊन भुसावळ संच-६ चा व्यावसायिक कार्यान्वयन दिनांक (COD) रोजीचा भांडवली खर्च मंजूर करण्यात यावा;

६. प्रवर्ग क (Category C) वीज केंद्रांसंदर्भात CEA च्या दिनांक २५.०७.२०२५ च्या MoM च्या पार्श्वभूमीवर FGD प्रणालीचे कार्यान्वयन थांबविण्याबाबत केलेले निवेदन विचारात घेण्यात यावे आणि MYT दराच्या उद्देशाने आजपर्यंत झालेला केवळ "**भांडवलीखर्च"** विचारात घेण्यास मान्यता देण्यात यावी;

७. आ. व. २०२४-२५ साठी महावितरण ला वीज विक्री करण्यासाठी भुसावळ संच-६ चा दर तसेच ५ व्या MYT नियंत्रण कालावधीसाठी आ. व. २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीतील दर मंजूर करण्यात यावा;

८. सदर याचिकेच्या अनुषंगाने आ. व. २०२४-२५ साठी मंजूर करण्यात आलेल्या दराच्या आधारे आ. व. २०२४-२५ चे तात्पुरते अंतिम समायोजन (Provisional True Up) मंजूर करण्यात यावे;

९. याचिकेमध्ये झालेली कोणतीही त्रुटी/चूक/वगळलेली बाब माफ करण्यात यावी आणि ती दुरुस्त करण्यासाठी याचिकाकर्त्यास संधी देण्यात यावी;

१०. आवश्यकतेनुसार वेळोवेळी सदर याचिकेमध्ये पुढील निवेदने, भर किंवा बदल करण्यास याचिकाकर्त्यास परवानगी देण्यात यावी;

११. सदर प्रकरणातील तथ्ये व परिस्थिती लक्षात घेता मा. आयोगास योग्य व न्याय्य वाटतील असे इतर कोणतेही आदेश अथवा निर्देश पारित करण्यात यावेत.